# प्रेसनोट

दिनांक— ०६/१२/२०१८.

## डोंबिवली पोलीस स्टेशन येथील सहायक पोलीस निरीक्षक व खाजगी इसमांना लाच स्विकारताना अटक

दिनांक ०५/१२/२०१८ रोजी, डोंबिवली पोलीस स्टेशन येथील सहायक पोलीस निरीक्षक **सुनिल भाऊराव वाघ, वय ३४ वर्षे,** खाजगी इसम **महेश रतन पाटील, वय ३६ वर्षे व** खाजगी इसम **प्रकाश रामलाल दर्जी वय ३६** यांना यातील तक्रारदार यांच्याकडून १,००,०००/— रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांना डोंबिवली पोलीस स्टेशन येथे प्रथमेश ज्वेलर्स चे मालक श्री कोठारी यांच्यावर दाखल असलेल्या गुन्हयामध्ये न अडकवण्यासाठी तसेच तक्रारदार यांचे गोल्ड ज्वेलरी मेकिंगचे पेपर, गुमस्ता लायसन, रुमचे ॲग्रीमेंट इत्यादी कागदपत्रे त्यांना परत करण्यासाठी वरील **नमुद लोकसेवक यांचेतर्फे खाजगी इसम महेश रतन पाटील** यांनी तक्रारदार यांचेकडे १०,००,०००/— रुपयांची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०३/१२/२०१८ रोजी पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन ऐसीबी, ठाणे युनिट यांनी सापळयाचे आयोजन करुन **लोकसेवक सुनिल भाऊराव वाघ** यांच्यावतीने खाजगी इसम **प्रकाश रामलाल दर्जी** यांना तक्रारदार यांच्याकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणुन १,००,०००/—(एक लाख) रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले व खाजगी इसम **महेश रतन पाटील** यांना अटक करण्यात आले आहे. सदरबाबत गुन्हा दाखल असुन गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती सीमा आडनाईक, पोलीस निरीक्षक ऐसीबी, ठाणे हया करीत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ८१०८९४९४६० असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner